दाखल तारीख : ०२.०१.२०१८
नोंदणी तारीख : ०२.०१.२०१८
निकाल तारीख : ०६.०९.२०१८
कालावधी : व. म. दि.
००  ०८  ०४

**उमरगा येथील न्याय दंडाधिकारी प्रथम वर्ग, यांचे न्यायालयात**
**(पिठासिन अधिकारी–श्री.आय. एम. नाईकवाडी)**

नियमित फौजदारी खटला क्र. **०१/२०१८**
CNR-MHOSO7-000005-2018
निशाणी क्र.३९

सरकार तर्फे पोलिस निरीक्षक }
उमरगा पोलीस ठाणे,उमरगा } **अभियोग पक्ष**
ता.उमरगा, जि.उस्मानाबाद. }

**विरूध्द**

१. धोंडीराम तुळशीराम कांबळे, }
वय–२५ वर्षे, धंदा–चालक }
रा.दाळींब ता.उमरगा. }

२. अंबिका धोंडीराम कांबळे }
वय–२२ वर्षे, धंदा–घरकाम }
रा.सदर. } **आरोपी**

**हजर विधिज्ञ**

अभियोगपक्षातर्फे सहा.सरकारी अभियोक्ता : श्री. व्ही. एन.मुलगीर
आरोपीतर्फे विधिज्ञ : श्री. एस.डी.करके

---

**न्या य नि र्ण य**
( घोषीत दिनांक : ६ सप्टेंबर, २०१८)

१. प्रस्तुतचा खटला आरोपींविरूध्द भारतीय दंड संहिता कलम ३२४, ३२३, ५०४ सह ३४ अन्वये तोहमत ठेवून दाखल करण्यात आला आहे.

२. ***अभियोग पक्षाची थोडक्यात हकिकत खालीलप्रमाणे*** :—

फिर्यादी दत्तात्रय सोनकांबळे याने उमरगा पोलीस ठाण्यात फिर्याद दिली की, दिनांक २४.१०.२०१७ रोजी दुपारी ४.०० वाजणेच्या सुमारास फिर्यादीची आत्या ही आरोपीची आणलेली परडी परत देणेसाठी गेली असता आरोपी धोंडीराम याने तिला खडा मारल्याचे कारणावरून दोघामध्ये तक्रार चालू असल्याचा आवाज आल्याने फिर्यादी त्याबाबत विचारणा करणेसाठी गेला. त्यावेळी आरोपी धोंडीराम याने फरशीच्या तुकडयाने फिर्यादीच्या डोक्यात मारून दुखापत केली. भांडण सोडवण्यासाठी फिर्यादीची पत्नी, मावस भाऊ आले असता त्यांनाही आरोपींनी शिवीगाळ करून लाथाबुक्यांनी मारहाण केली. त्यावेळी लोकांनी भांडण सोडवले. त्यामुळे फिर्यादीने प्रस्तुत घटनेबाबत फिर्याद दाखल केली.

३. फिर्यादीने दिलेल्या फिर्यादीचे अनुषंगाने उमरगा पोलीस ठाणे येथे गु. र.नं.१९८/२०१७ हा भारतीय दंड संहिता कलम ३२४,३२३,५०४ सह ३४ अन्वये नोंदविण्यात आला. तपासी अधिकारी यांनी तपासादरम्यान गुन्हयाचे ठिकाणास भेट देवून घटनास्थळाचा पंचनामा व फरशीचा तुकडा यांचा जप्ती पंचनामा केला. साक्षीदारांकडे चौकशी करुन त्यांची तपासटिपणे नोंदविली, जखमीचे वैद्यकीय प्रमाणपत्र हस्तगत केले व तपास पुर्ण झालेनंतर आरोपींविरूध्द न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले.

४. आरोपींविरूध्द निशाणी १९ वर वरील कलमान्वये दोषारोप ठेवून त्यांना आरोपांचे स्वरूप समजावून सांगितले असता आरोपींनी त्यांचेवरील आरोप नाकारून खटला पुढे चालविण्याची विनंती केली.

५. प्रस्तुत खटल्याचे निर्णयार्थ खालील मुद्दे माझे विचारार्थ उपस्थित होतात,त्यावरील माझे निष्कर्ष कारणमिमांसेसहीत खालीलप्रमाणे नोंदविण्यात आले.

| मुद्दे | | निष्कर्ष |
|---|---|---|
| १ | दि.२४.१०.२०१७ रोजी दुपारी ४.०० वाजणेच्या सुमारास मौजे दाळींब येथे आरोपींनी आपसात संगनमत करून फिर्यादीला फरशीचा तुकडा यासारख्या घातक शस्त्राने इच्छापुर्वक दुखापत केली ही बाब अभियोगपक्षाने शाबीत केली आहे काय ? | नकारार्थी |
| २ | वर नमुद वेळी, ठिकाणी व दिवशी यातील आरोपींनी आपापसात संगनमत करून साक्षीदाराला लाथाबुक्यांनी इच्छापुर्वक मारहाण केली ही बाब अभियोगपक्षाने शाबीत केली आहे काय ? | नकारार्थी |
| ३ | वर नमुद वेळी, ठिकाणी व दिवशी यातील आरोपींनी आपापसात संगनमत करून फिर्यादी व साक्षीदाराचा अपमान व्हावा या उद्देशाने शिवीगाळी करून प्रक्षोभीत केले ही बाब अभियोगपक्षाने शाबीत केली आहे काय ? | नकारार्थी |
| ४ | आदेश काय ? | आरोपींना निर्दोष मुक्त करणेत आले. |

## <u>का र ण मि मां सा</u>

६. आरोपींवरील आरोप शाबीत करण्याकरिता अभियोगपक्षाने एकुण दोन साक्षीदारांचा जबाब नोंदविला आहे. अभियोग पक्षाने फिर्यादी दत्तात्रय सोनकांबळे (सा.क्र.१) यांची साक्ष निशाणी २७ वर नोंदविली आहे. जखमी आणि प्रत्यक्षदर्शी साक्षीदार महानंदा सोनकांबळे (सा.क्र.२) हिची साक्ष निशाणी २८ वर नोंदविली आहे. आरोपीने घटनास्थळ पंचनामा व वैदयकीय प्रमाणपत्र कबूल केल्याने त्यांना अनुक्रमे निशाणी २९ व ३० देण्यात आले. अभियोग पक्षाचे पुराव्यात आरोपींविरुध्द गुन्हादर्शक सामुग्री न आल्याने त्यांचे फौजदारी प्रक्रिया संहीता कलम

३१३ अन्वये निवेदन नोंदविणेत आले नाही.

***मुद्दा क्र.१ ते ३ बाबत*** :—

८. उपरोक्त सर्व मुद्दे हे एकमेकांशी निगडीत असल्याने त्यासाठी करावे लागणारे विवेचनाची पुनरावृत्ती टाळण्यासाठी ते विश्लेषणासाठी एकत्रित घेतले आहेत.

९. फिर्यादी दत्तात्रय सोनकांबळे (सा.क्र.१) शपथेवर असे कथन करतो की, त्याची आत्या व आरोपी यांच्यात बाचाबाची झाली होती, त्यावेळेस त्याला दरवाजा लागला. फिर्यादवरील सही त्याने मान्य केली, परंतु त्यातील मजकुर माहित नसल्याचे तो सांगतो. फितूर घोषित करण्यात येवून घेण्यात आलेल्या उलटतपासामध्येही फिर्यादीने फिर्यादमधील आरोपीकडून मारहाण झाल्याबाबतचा व इतर मजकुर स्पष्टपणे नाकारला. तसेच आरोपींबरोबर कोर्टाबाहेर तडजोड झाल्याचेही त्याने मान्य केले. तो पुराव्याचे कामी मदत करू शकलेला नाही. तसेच खटल्यातील मूळ फिर्यादही सिध्द होवू शकली नाही.

९. अभियोग पक्षाने महानंदा सोनकांबळे (सा.क्र.२) या जखमी/प्रत्यक्षदर्शी साक्षीदारास निशाणी २८ वर तपासले आहे. याही साक्षीदाराने तिचे सरतपासात आरोपींनी फिर्यादीला काहीही केले नव्हते केवळ बाचाबाची झाली होती आणि याशिवाय काहीही घडले नव्हते असे कथन केले.

१०. एकदंरीत पुराव्यावरून असे दिसून येते की, फिर्यादी आणि जखमी साक्षीदार अभियोग पक्षाचे कथनांप्रमाणे साक्ष देत नाही. फिर्यादी व आरोपींची तडजोड झाली असून त्याबाबतची तडजोड पुरसीस निशाणी २६ वर दाखल केली आहे. अशा परिस्थितीमध्ये आरोपींनी फिर्यादीला फरशीचे तुकडयाने मारहाण करून शिवीगाळ केली या बाबी शाबीत करणेकरिता कोणताच पुरावा अभिलेखावर आलेला नाही. त्यामुळे मी मुद्दा क्र. १ ते ३ चे उत्तर नकारार्थी देत आहे.

***मुद्दा क्र. ४ करिता***

११. मुद्दा क्र. १ ते ३ चे उत्तर मी नकारार्थी स्वरूपात दिले आहे. आरोपींनी फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४३७—अ अन्वये तजविज केलेली आहे. त्यामुळे मुद्दा क्र.४ च्या उत्तरादाखल मी खालील आदेश पारीत करीत आहे.

**आ दे श**

१. आरोपी—धोंडीराम तुळशीराम कांबळे आणि अंबिका धोंडीराम कांबळे यांची भारतीय दंड संहिता कलम ३२४, ३२३,५०४ सह ३४ अन्वयेच्या शिक्षेस पात्र गुन्ह्यातून फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम २४८(१) नुसार निर्दोष मुक्तता करण्यात येत आहे.

२. मुद्देमाल फरशीचा तुकडा हा मुल्यहीन असल्याने अपिल कालावधीनंतर नाश करण्यात यावेत.

*( सदरहू न्यायनिर्णय खुले न्यायालयात जाहीर केला. )*

*सही/—*

*( आय. एम. नाईकवाडी )*

*दिनांक : ०६.०९.२०१८* *न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, उमरगा*